# पुणे पोस्ट अँड टेलिकॉम को.ऑप. क्रेडिट सोसायटी लि.चा स्नेह मेळावा संपन्न

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे पोस्ट अँड टेलिकॉम को.ऑप. क्रेडिट सोसायटी ली. संस्थेने नुकतेच १० ऑक्टोबर २०२५ रोजी कारकिर्दीची दैदिप्यमान १०४ वर्षे पूर्ण करून १०५ व्या वर्षात पदार्पण केले आहे, त्यानिमित्त सालाबादप्रमाणे संस्थेच्या सर्व शाखांमध्ये सभासद स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. सदाशिव पेठ शाखेमध्ये सत्यनारायण पूजा आयोजित केलेली होती त्यास सभासदांनी मोठ्या संख्येने संस्थेस भेट व शुभेच्छा दिल्या. ही माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

सदर संस्थेने सालाबादप्रमाणे गेल्या २५ वर्षे जपलेल्या परंपरेनुसार सभासदांना दरवर्षी डीव्हीडंड सह दिवाळीमध्ये देण्यात येणाऱ्या उत्तम प्रतीच्या गृहोपयोगी भेटवस्तूंमध्ये यावर्षी ब्रेडेड बोरोसील कंपनीच्या मिक्सर, ज्युसर, ग्राईंडर या उच्च गुणवत्ताप्राप्त भेटवस्तूचे वाटप सुरू केलेले आहे आणि सर्वच स्तरातून या भेटवस्तूंचे आवडीने स्वागत होत आहे, सभासद या वस्तूच्या निवडीचे कौतुक करीत आहे विशेषतः सभासदांचे कुटुंबीय, महिला सभासद यांच्यासाठी ही भेटवस्तू आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरलेली आहे, भेटवस्तूची किंमत जास्त नसली तरीही संस्थेने वस्तू निवडीबाबत दाखविलेला चोखंदळपणा, गुणवत्ता, मोठ्या प्रमाणावर केलेल्या खरेदीमुळे माफक दरामध्ये खरेदी यामुळे संस्थेचे सभासद असलेल्या पोस्टमन, लाईनमन, एमटीएस, मेलमन यांच्यापासून ते वरिष्ठ अधिकारी पदावर काम करणारे सर्वच सभासद या भेटवस्तूची आतुरतेने वाट पहात असतात आणि वाटप सुरू झाल्यावर सुखावतात. त्यासाठी शक्यतो दसरा ते दिवाळीच्या दरम्यानचा वेळ त्यासाठी गाठण्याचा संस्थेचा प्रयत्न असतो, अर्थात त्यासाठी बरीच आधी तयारी करावी लागते कारण नियमानुसार रीतसर जाहिरात देऊन टेंडर प्रक्रिया राबवून ही खरेदी केली जाते आणि मोठ्या प्रमाणावर असल्याने तेवढ्या वस्तू उपलब्ध होण्यासाठी पुरेसा वेळही द्यावा लागतो.

१० ऑक्टोबर १९२१ साली पुणे जी पी ओ च्या व्हरांड्यामध्ये इंग्रज अधिकारी सर ह्यूबर्ट सॅम्स यांनी सुरू केलेल्या संस्थेत पुढे स्व. करमरकर यांनी पोस्टल बँकेचे स्वरूप मिळवून दिले, छोट्याश्या रोपट्याच्या स्वरूपात सुरू झालेली संस्थेचा पुढे वटवृक्ष झाला व आज कल्पवृक्ष होऊन सर्वसामान्य सभादादांची घरे, गाड्या, उच्चशिक्षण अशी स्वप्ने पूर्ण करण्यासाठी संस्था मोठ्या प्रमाणावर आणि कमीत कमी कागदपत्रावर मोठे आर्थिक पाठबळ पुरवित आहे. त्यासाठी ७ विविध प्रकारची क्षमतेनुसार रु ५० लाख रकमेपर्यंतची कर्जे माफक दरामध्ये सभासदांना वितरित केली जातात.

संस्थेद्वारे हमिनीधी, तातडीचे, बचतफंड, शैक्षणिक, गृह, वाहन, गृहोपयोगी अशा विविध कर्जाचे वितरण होते तसेच विशेषता सभासदांच्या मुलींसाठी कन्यादान, संस्थेची लेक व लग्न व इतर मंगल कार्यासाठी सुसज्ज वातानुकुलीत ३ हॉल व रहाण्याची उत्तम सोय असलेले सर्व सुविधांयुक्त एमरल्ड बहुद्देशीय भवन अत्यल्प दरात उपलब्ध करून देण्यासाठी उभारलेले आहे, सभासदांच्या गुणवत्ता प्राप्त पाल्यांचा सन्मान सोहळा, कोकणात पर्यटनासाठी जाणाऱ्या सभासदांसाठी दापोली येथे सुसज्ज हॉलिडे होम, दुर्धर आजारांमध्ये सभासदांन भरीव मदत, सभासद मृत्यू पावल्यास दहा लाखापर्यंत कर्जमाफी, सेवानिवृत तसेच २६ वर्षे पूर्ण झालेल्या सभासदांचा २६ जानेवारी रोजी सत्कार समारंभ, ठेवीदार व सेवानिवृत्त सभासांसाठी आरोग्यविषयक कार्यक्रम, वर्धापन दिनानिमित्त सभासदांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम, खात्यातील खेळाडूंचा सत्कार, राज्य पातळीवरील खात्याच्या स्पर्धांसाठी ट्रॉफी टी शर्ट यांचे प्रायोजक इत्यादी कार्ये केली जातात, संस्थेची लेक १ जानेवारी २०१३ पासून संस्थेने आपली एक महत्वाकांक्षी व लोकप्रिय योजना राबविली आहे, लेक वाचवा लेक शिकवा अशी घोषवाक्य तर रिंप सगळीकडेच पाहातो, प्रत्यक्ष त्याची कार्यवाही करणारी आपली संस्था आहे, सभासदांची मुलगी जन्माला आली की लगेच एक बर्थ सर्टिफिकेट च्य शी घेऊन संस्था त्या मुलीच्या नावे वेगळी ठेव करते, त्या मुलीला अठरा वर्ष पूर्ण होताच तिच्या खात्यावर पन्नास हजार रुपये जमा होतात असे सांगण्यात आले.

## पदवीधर मतदार यादीत ६ नोव्हेंबरपर्यंत नाव नोंदविता येणार

**लातूर/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोग व राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या निर्दे शानुसार ०५-औरंगाबाद विभागाकरीता पदवीधर मतदारसंघासाठी नव्याने मतदारयादी तयार करण्याचा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. यानुसार मतदारयादीत नाव समावेश करण्याची अंतिम मुदत ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आहे.

पदवीधर मतदारसंघाची मतदारयादी प्रत्येक निवडणुकीपूर्वी नव्याने तयार केली जाते. त्यानुसार सर्व पदवीधारकांनी विहित नमुन्यात नव्याने अर्ज दाखल करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने ०५-औरंगाबाद विभागाकरीता नव्याने तयार होणाऱ्या मतदारयादीत नाव समावेश करण्यासाठी लातूर तालुका हद्दीत सर्वसाधारण रहिवासी असलेल्या सर्व पदवीधारकांनी लातूर तहसील कार्यालय येथे नियुक्त पथकाकडे ६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन लातूर उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे व तहसीलदार सौदागर तांदळे यांनी दिले आहे.

## स्वरानंदात रंगली सुरमयी दिपावली पहाट




**लातूर/प्रतिनिधी :** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालय, मराठवाडा संगीत कला अकादमी, दत्त मंदिर संस्थान,औसा रोड,लातूर,रोटरी क्लब,लातूर आणि डी.एस.ग्रुप,लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दत्त मंदिर,औसा रोड, लातूर याठिकाणी आयोजित 'सुरमयी दिपावली पहाट' या कार्यक्रमाची सुरुवात सुप्रसिद्ध गायिका गोकर्णा जाधव यांनी नाम गाऊ नाम घेऊ हा संत तुकारामांचा अभंग गाऊन केली. यानंतर कु.भाग्यश्री देशपांडे यांनी माझी रेणुका माऊली हे भक्तिगीत सादर करून रसिक श्रोत्यांना स्वरानंदात डुंबविले. त्यांना तबलासाथ प्रा.विश्वनाथ स्वामी यांनी केली तर हार्मोनियम साथ प्रा. सूर्यकांत घोडके यांनी दिली.

याप्रसंगी सोलापूर येथील सुविख्यात युवा गायक अनिरुद्ध वाघचवरे यांनी राग नंद मध्ये विलंबित लयीमध्ये बडाख्याल व मध्यलयीमध्ये छोटाख्याल ची बंदिश अतिशय तयारीने गायली ,त्यानंतर त्यांनी१५ मात्राचा पंचमसवारी तालामध्ये तुजविण कोण शरण जावो नारायणा हा अभंग आणि काया ही पंढरी आत्मा हा विठ्ठल हे अभंग बहारदारपणे सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांना तबलासाथ प्रभाकर वाघचवरे यांनी केली तर हार्मोनियम साथ प्रा सूर्यकांत घोडके यांनी केली. त्यानंतर या दिपावली पहाट कार्यक्रमाप्रसंगी मुंबई येथील युवा सितारवादिका गरिमा आणि रिद्धीमा शेजाळ भगिनी यांनी राग चारुकेशी आणि राग रागेश्री मध्यलय व दृत तीनताल मध्ये बहारदार सितारवादन करून रसिकांची उत्स्फूर्त दाद घेतली.त्यांना तबलासाथ तालमणी डॉ राम बोरगावकर यांनी केली तर हार्मोनियम साथ प्रा.सूर्यकांत घोडके यांनी दिली. या दिपावली पहाट कार्यक्रमाप्रसंगी मुंबई येथील युवा सितारवादिका गरिमा आणि रिद्धीमा शेजाळ भगिनी यांनी राग चारुकेशी आणि राग रागेश्री मध्यलय व दृत तीनताल मध्ये बहारदार सितारवादन करून रसिकांची उत्स्फूर्त दाद घेतली.त्यांना बहारदार तबलासाथ तालमणी डॉ राम बोरगावकर यांनी केली.

शेवटी सर्व श्रोते व कलावंत यांनी सार्वजनिक स्वरूपामध्ये ओम नमो भगवते ,दिगंबरा दिगंबरा, रघुपती राघव राजाराम या धून गाऊन दिपावली पहाटेचा आनंद द्विगुणित केला.

या सूरमयी दिवाळी पहाट या कार्यक्रमाप्रसंगी आयोजक तालमणी डॉ.राम बोरगावकर,डी. एस. ग्रुपचे संचालक तुकारामभैय्या पाटील,श्री.अमृत महाराज, प्रा.गणेश बोरगावकर,डॉ. बी.आर.पाटील,श्री.रमेशजी बिरादार, प्रा.सच्चिदानंद ढगे,श्री.सोमेश्वर स्वामी, श्रीमती वैद्य मॅडम,सौ.सुनीता बोरगावकर,प्रा.नामदेव साठे,प्रा.विवेक ढगे, प्राचार्य डॉ. सुदाम पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

## महिला कामगारांना दीपावली निमित्त फराळाचे वाटप




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागात घनकचरा व्यवस्थापनाचे काम करणाऱ्या महिलांना दीपावली निमित्त जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा घुगे व आयुक्त श्रीमती मानसी यांच्या हस्ते फराळाचे वाटप करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा घुगे यांनी महिला कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. कर्मचाऱ्यांनी सुरक्षिततेसाठी आवश्यक साधनांचा वापर करावा,पीपीई किट वापरावे. पुरुष कामगारांनी पायांना इजा होऊ नये यासाठी मोठे बूट वापरावेत, अशा सूचनाही त्यांनी केल्या. सर्व कामगारांना त्यांनी दीपावली निमित्त शुभेच्छा दिल्या.काही महिला कामगारांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.आपल्या कामाचे स्वरूप जिल्हाधिकारी व आयुक्तांना सांगितले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ.पंजाब खानसोळे, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, मुख्य स्वच्छता निरीक्षक रवी कांबळे,डी. एस. सोनवणे ळ,शिवराज शिंदे, अक्रम शेख यांच्यासह स्वच्छता निरीक्षक आणि कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## ओंकारच्या माध्यमातून निलंगेकराचा ट्रिपल धमाका

### शेतकऱ्यांना दिवाळी भेट,२०० रुपयांचा हप्ता, मोफत साखरचे वाटपाचे तिसरे वर्षे

### अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना १ कोटींची मुख्यमंत्री सहाय्यता निधी

**निलंगा/आयुब बागवान :** निलंगा तालुक्यातील डॉ. शिवाजीराव पाटील साखर कारखाना लीज ओंकार ग्रुप यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची दिवाळी गोड करत एक अनुकरणीय निर्णय घेतला आहे. कारखान्याकडून शेतकऱ्यांना प्रती टन २०० रुपयांचा अतिरिक्त हप्ता देण्यात आला असून, मोफत साखर व अतिवृष्टी शेतकऱ्यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी एक कोटी रुपयाची मदत करून शेतकऱ्या प्रति संवेदनशील असलेले नेते माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी ट्रिपल धमाका केला आहे.

यापूर्वी दिलेल्या दोन हजार ७५० रुपये व दिवाळी भेट म्हणून दोनशे रुपये असे एकूण दोन हजार ९५० रुपये प्रती टन दर ओंकार ग्रुपकडून दिला गेला आहे. या निर्णयामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

ओंकार साखर कारखान्याकडून दरवर्षी दिवाळी सणानिमित्त, ज्या शेतकऱ्यांनी कारखान्यास ऊस पुरवठा केला आहे त्या सर्व शेतकऱ्यांना मोफत साखर वाटप करण्याची घोषणाही करण्यात आली आहे. तीन वर्षापासून मोफत साखर देण्याचा उपक्रम कारखान्याने सुरू ठेवला आहे. यामुळे हा निर्णय शेतकऱ्यांच्या आनंदात भर घालणारा हा निर्णय ओंकार ग्रुपच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवतो. ओंकार ग्रुपने मुख्यमंत्री सहाय्यता निधीस तब्बल एक कोटी रुपयांची मदत केली आहे. अतिवृष्टी, सततचा पाऊस आणि महापुरामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी ही मदत मोठा दिलासा ठरणार आहे. सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवतो.

ओंकार ग्रुपने शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी समजून घेत, ''शेतकऱ्याचे देणे आपण समाज म्हणून फेडलेच पाहिजे'' या भावनेतून ही मदत दिली आहे. सामाजिक बांधिलकी आणि शेतकरीहिताची भूमिका कायम राखत ओंकार ग्रुपने पुन्हा एकदा दाखवून दिले की, शेतकऱ्याच्या पाठिशी उभे राहणे हेच खरी दिवाळीची गोडी आहे. मागील तीन वर्षापासून यशस्वी पुणे यस्वीपणे गळीत हंगाम पूर्ण केला असून यंदाच्या हंगामासाठी कारखाना प्रशासनाने पूर्ण तयारी केली असून नुकतेच रोलर पूजन पूर्ण झाले शिवाय वाहतुकीचे सर्व करार झाले असून लवकरच यंदाचा गळीत हंगाम सुरू होणार आहे. अंबुलगा कारखाना सुरू झाल्यामुळे जिल्ह्यातील अन्य कारखानदाराची संपुष्टात आली आहे. सामाजिक उपक्रम राबवून शेतकऱ्यांच्या अडीअडचणीमध्ये सहभाग नोंदवत असतो या कारखान्याने यंदा ट्रिपल धमाका केला असून या निर्णयाचे शेतकऱ्याकडून सर्वत्र अभिनंदन होत आहे



**कोणाला किती साखर मिळणार**

- ज्या शेतकऱ्यांचा ऊस पुरवठा १ ते ३० टनांपर्यंत आहे, त्यांना १० किलो साखर मिळणार आहे.
- ३१ ते ५० टन ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना २० किलो साखर दिली जाणार आहे.
- ५१ ते १०० टन ऊस पुरवठा असणाऱ्यांना ३० किलो साखर मिळणार आहे.
- १०१ ते १५० टन ऊस पुरवठा करणाऱ्यांना ४० किलो साखर देण्यात येईल.
- १५१ ते २०० टन ऊस देणाऱ्या शेतकऱ्यांना ५० किलो साखर मिळेल.
- २०१ ते ३०० टन ऊस पुरवठा करणाऱ्यांना ७० किलो साखर दिली जाणार आहे.
- ३०१ टनांपेक्षा जास्त ऊस देणाऱ्या शेतकऱ्यांना १०० किलो साखर वाटप करण्यात येईल.

तर कारखान्याचे कर्मचारी यांना प्रत्येकी १० किलो साखर मिळणार आहे.

एकूण ४४७६ शेतकरी व कर्मचारी या योजनेचा लाभ घेणार आहेत.

## धनत्रयोदशी ..

त्रयोदश्यांदीपदानात
सूर्य ज प्रयताम् मम
दीपदान करे सकला
विशेषतः पूजावा यम

मृत्यूनांदंडपाशाभ्याम्
स्वस्थायुष्य देही मम्
उजळावे दीपोत्सवाने
करा काही पुण्यकरम

धन्वंतरी देवांचा वैद्य
या शुभदिनी घे जनम्
ऋण कृतज्ञता करता
रे आनंद लाभेलं परम

लक्ष्मी देवता प्रकटली
समुद्र मंथनातून चरम
धर्मा मागे शास्त्र कळे
मिटेल तेंव्हा ते संभ्रम

सढळ हस्ते दान करी
पाळा मानवता धरम
आळसात नको जीणे
सार्थ जीवना परिश्रम

आयु अल्प सांगी यम
आखा नीट कार्यक्रम
पाप टाळ पुण्य संचय
सुनियोजित दिन क्रम

श्रेष्ठतम जीवनसुसंधी
जनम् ना माणसासम
आयुष्य करावे सुगंधी
गुणवर्धन रे ईश्वरासम

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

## ओसवाल जैन ट्रस्ट व जीवनदीप फाउंडेशनच्यावतीने ६०० दिव्यांगांना दीपावली किराणा किटचे वाटप

**लातूर/प्रतिनिधी :** नवी मुंबई ओसवाल जैन ट्रस्ट व जीवनदीप फाउंडेशन लातूरच्या संयुक्त विद्यमाने दीपावली सणानिमित्त ६०० हुन अधिक दिव्यांगांना किराणा किटचे मोफत वाटप करण्यात आले.

लातूर शहरातील कोरे गार्डनमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमास नवी मुंबई ओसवाल जैन ट्रस्टचे संचालक निर्मल दर्डा , नायब तहसीलदार औसा सुरेश पाटील, यशवंत नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष सुहास पाचपुते, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र अध्यक्ष डॉ. राजेश पाटील, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोष नाईकवाडे, सेवानिवृत्त तहसीलदार काशिनाथ पाटील, पोलीस उपनिरीक्षक रमाकांत चाटे, उद्योजक संतोष कोटेचा आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

जीवनदीप फाउंडेशन लातूर आणी नवी मुंबई ओसवाल जैन ट्रस्ट, यांच्या संयुक्त विद्यामाने लातूर येथे प्रति वर्षाप्रमाणे ६०० दिव्यांग कुटुंबीयांना दीपावली किराणा किट वाटप केले गेले. गेल्या वर्षीही ३०० लोकांना अशा किटचे वाटप करण्यात आले होते. पुढील वर्षी किमान १००० परिवारांना अशा प्रकारचे किट वाटप करण्याचा प्रयत्न राहणार आहे. दिवाळीच्या आनंदापासून कोणीही वंचित राहू नये, या उद्देशाने सदर उपक्रमाचे आयोजन प्रतिवर्षी करण्यात येते.



जीवनदीप फाउंडेशन गेल्या ११ वर्षापासून सामाजिक क्षेत्रात काम करत आहे. इतकेच नाही तर गेल्या वर्षी महानगर पालिका, जिल्हा परिषद व गरीब शाळांमधील २२ हजारांहून अधिक विद्यार्थींना प्रत्येकी ६ रजिस्टर व ४ वही असे देण्यात आले होते आणि या वर्षीही त्यात वाढ करून ४१ हजार विद्यार्थ्यांना देण्यात आले. या दोन्ही कार्यात मोलाचा वाटा प्रयास फाउंडेशन ट्रस्ट, व नवी मुंबई ओसवाल जैन ट्रस्ट, यांचा आहे. सोबतच लातूर येथील राजेश मुकेश मित्तल, जयनारायण खंडेलवाल, अविनाश आळंदकर, सौ. रेखा भिलावे, दशरथ माने यांचेही मोलाचे अर्थसहाय्य लाभले आहे. या बरोबरच जीवनदीप फाउंडेशनच्या वतीने गेल्या महिन्यात श्री संत गाडगे बाबा मतीमंद शाळेच्या सर्वच विद्यार्थ्यांना शालेय गणवेश देण्यात आले आहेत.

महिला सक्षमीकरणात सुद्धा मोलाचे योगदान जीवनदीप फाउंडेशन देत असते, आणि सिंगल पालकांच्या २२ मुलींचे विवाह स्वखर्चाने करून दिले आहे. महिला स्वावलंबन साठी आवश्यकतेनुसार कधी शिलाई मशीन तर कधी पिठाची गिरणी, तर कधी पिको मशीन देत असते. तसेच अनेक महिलाना रोजगार उपलब्ध करून देत असते. महिला आत्मनिर्भर होण्यासाठी छोटे छोटे काम मिळवून देते. उदा. साबण बनवणे, विकणे, पिशवी बनवणे, विणकाम करविणे इत्यादी उपक्रम या संस्थेच्या माध्यमातून राबविले जातात. यास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो. जीवनदीप फाउंडेशन आरोग्य क्षेत्रात ही संस्था खूप भरीव काम करते, जसे की डेंटल कॅम्प, ब्लड डोनेशन कॅम्प, आय कॅम्प, मोतीबिंदू ऑपरेशन इत्यादी कॅम्प घेत असते. सोबत वृक्षारोपणाचे कार्यक्रम, लातूर स्वच्छता अभियान असे विविध उपक्रमाच्या माध्यमातून स्वच्छ लातूर,निरोगी लातूर साठी सतत प्रयत्नशील आहे. दिपावलीनंतर १ हजार गोरगरीब मुलांना स्वेटर वितरित करण्याचा मानस आहे. तसेच एक रुग्णवाहिकाही देण्याचा मानस असल्याचे जीवनदीप च्या अध्यक्षा सौ. संगीता दिलीपचंद चोपडा यांनी सांगितले. यावेळी निर्मल दर्डा , सुहास पाचपुते, यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिलीपचंद चोपडा, बालाजी कोटलवार, रामेश्वर लड्ढा, सोनाली चोपडा, स्वाती काळे, अरुणा दामा आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन राजेश डुंगरवाल यांनी केले.


निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६